No. of Printed Pages : 6 **FMT–01**

# BACHELOR'S DEGREE PROGRAMME (BDP)

## Term-End Examination

## December, 2024

### FMT–01 : FOUNDATION COURSE IN MARATHI

*Time : 2 Hours* *Maximum Marks : 50*

***नोट :*** सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : 10

   (क) मातृभाषा आणि शिक्षण

   (ख) विज्ञानाचे फायदे व तोटे

   (ग) पर्यावरण आणि विकास

   (घ) ऑनलाईन शिक्षण सोय की गैर–सोय

2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : 8

   (क) संत तुकाराम साधूची कोणती लक्षणे सांगतात ?

(ख) कोशवसुतांच्या प्रतिभेचे कार्य विशद करा.

(ग) यंत्रयुगातील प्रतिमाचित्र तुमच्या शैलीत रेखाटा.

(घ) अक्कावर झालेला मायेचा कौतुक वर्षाव वर्णन करा.

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(क) 'वळीव' कथेत पहिल्या पावसाचे आगमन कसे झाले ?

(ख) बहिणीची माया अपारच, असे प्रह्लाद का म्हणतो ?

(ग) लेखकाच्या मते आकाश दर्शनातून हिप्पीसारखे संप्रदाय कसे निर्मान झाले ?

(घ) 'सांबरा' तील मुरलीमाय व झिप्रीचा संवाद वर्णन करा.

4. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर टीपा लिहा : 6

(क) गुंड्याभाऊ आणि वैद्यकिय तपासणी

(ख) वसतिगृहाचे महत्व

(ग) चांगला नागरिक कोण ?

(घ) बालगंधर्वांचे रंगभूमीवरील दर्शन

5. विभक्ती म्हणजे काय ? सप्तमीची अनेकवचनी रूपे सांगा : 5

(क) काळीज

(ख) चिमणी

(ग) दार

**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळीत विस्तार करा :

(क) खायला टकराधो अन् कामाले आग लागो.

(ख) अरोग्य हे ऐश्वर्य.

(ग) दाम करी काम.

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्यप्रचारांचा अर्थ सांगा : 3

(क) आभाळ फाटणे

(ख) अंगाची लाही होणे

(ग) उंटावरचा शहाणा

(घ) कळीचा नारद

(ङ) सद्गदित होणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही **तीन** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(क) हसतील त्याचे दात दिसतील

(ख) सेवा करील तो मेवा खाईल

(ग) वाघाच्या घरी शेळी पाहुणी

(घ) शिर सलामत तो पगडी हजार

(ङ) सोंग केले सजून, दिवटी गेली विझून

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : 4

(क) अक्षर वाङ्मयाचे महत्व स्पष्ट करा.

(ख) राजकीय लोकशाही बरोबर सामाजिक लोकशाही हवी चर्चा करा.

(ग) कर्मवीर भाऊरावांचे तत्वज्ञान तुमच्या शब्दात सांगा.

(घ) स्त्रीमुक्ती चळवळ व समाजवादी व्यवस्था चर्चा करा.

8. खालील इंग्लीश उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

Last year in the month of July the Yamuna river in Delhi showed its fury to the villages situated on its banks. As a result of heavy downpour the river was in flood. It began to rise

very rapidly, and crossed the danger point within a few days. It began to overflow its bank. The people living in the nearby colonies found themselves in a critical condition. Many houses collapsed. The swift currents of water swept away their cattle. Some people climbed up the tall strong trees in the hope of saving their lives. The crops were damaged. There was water and water everywhere. The household goods was floating in water. Many trees were uprooted. The roofs over the Yamuna bridge were submerged in water.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

त्याचे मन उदास झाले व तो चालू लागला. एक अरुंद रस्ता ओलांडला की, त्या मागे कड्यावर जाण्याची ओबड–धोबड वाट सुरू होते, हे त्याला माहित होते. तो रस्ता पार करतांना मात्र काळीज तळमळणार याची त्याला आधिपासून भीती होती. तो पहिल्याच उध्वस्त घरापाशी थांबला. आता उघड्या भिंतीखेरीज तेथे काहीच उरले नव्हते. वरुन प्रकाश आत उतरला होता. धुरकटलेली भिंत व तिच्याखाली अद्याप तगलेली फुटकी चूल यावर प्रकाश पसरला होता. ही चूल आपली अन्नदात्री या धरात आपण जन्मलो, वाढलो. पण आता माणसे पांगुन निघून गेली. कोणालाच नको झालेले हे घर आता हाय खाऊन असे

झाले. थोड्या अंतरावर गोठे होते. त्यात एके काळी रस्ता भरून टाकणारी गुरे होती. पुढे थोड्या अंतरावर तो एक कलंडलेल्या घराजवळ रेगांळला. त्याची एक खिडकी अद्याप उभी होती. त्याला वाटले आपण अजून थोडा वेळ थांबलो तर आतून आपल्या नावाची हाक ऐकू येणार! कारण ते घर त्याच्या बालमित्राचे होते. परंतु हाक ऐकू आली नाही. भिंती छपरावरून ऊन निर्विकारपणे ओघळत होते, आणि रान झाडे वाऱ्यात डुलत होती.

× × × × × × ×